| MHSN060036332016 | **आदेश निशाणी क्र.४७ नि.दि.दा.क्र.३६२/२०१६**<br>चिन्मय मगदुम वि. महादेव मगदुम<br>**{दि.१३ जून–२०२५}** |
|---|---|

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार महेश महादेव मगदुम यांनी प्रतिवादी म्हणुन प्रस्तुत दाव्यात सामील करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १ नियम १० अन्वये दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे न दिल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविणेचा आदेश दिनांक १९/०३/२०२५ रोजी पारीत झालेला आहे. सबब अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला.

३. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदाराचा अर्ज, दावा व प्रतिवादींचा खुलासा कैफियत तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता मी खालील मुददे नोंदविले.

| अनु.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे प्रतिवादी म्हणून दाव्यात हजर करून घेण्यास पात आहेत काय ? | **होय.** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजुर करून अर्जदार यांना प्रतिवादी बनविण्यात येत आहे.** |

५. अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यासाठी तसेच हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हे अर्जदार यांचे वडील होते. तथापी ते दिनांक १४/१०/२०२० रोजी मयत झाले आहेत. दावा मिळकती या वादी व अर्जदार यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती

असुन त्यामध्ये अर्जदार यांचा हक्क व हिस्सा होता व आहे. दावा दाखल करतेवेळी वादीने अर्जदार यांना त्यांचा हक्क व हिस्सा मिळु नये म्हणुन पक्षकार केलेले नाही. याशिवाय प्रतिवादी क्र.१ मयत झालेनंतर सुध्दा प्रस्तुत अर्जदार यांना त्यांचे मयत प्रतिवादी यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेतले नाही. प्रतिवादी क्र.२ ते ५ हे अर्जदार यांचे सावत्र भाऊ व बहिण असुन प्रतिवादी क्र.१ यांच्या मृत्यु पश्चात त्यांना वाटणी मिळु नये म्हणुन सदर वादी यांनी त्यांना पक्षकार केले नाही. दावा मिळकत १अ व १ब या मिळकतीसाठी न्यायालयात प्रतिवादी क्र.१ महादेव दुंडाप्पा मगदुम व त्यांचे भाऊ, बहिण यांचे दरम्यान रे.दि.मु.नं.३०३/२०१३ चा वाटपाचा दावा न्यायप्रविष्ठ आहे. सदर दावेमध्ये महादेव दुंडाप्पा मगदुम मयत झालेनंतर प्रस्तुत अर्जदार यांना त्यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेतले आहे. अर्जदार हे मयत महादेव दुंडाप्पा मगदुम यांचे वारस आहेत याची प्रथमपासुन माहिती होती व आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुत अर्ज केला आहे.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १ नियम १०(२) अन्वये न्यायालय दाव्यातील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्यावर, कोणत्याही पक्षकाराकडुन आलेल्या अर्जावरुन अथवा तसा अर्ज आलेला नसतांनाही आणि न्यायालयास न्याय्य वाटेल अशा अटी व शर्तींवर वादी किंवा प्रतिवादीपणात एखाद्या पक्षकारास की, ज्या व्यक्तीला वादी किंवा प्रतिवादी म्हणुन दाव्यात सामील करुन घ्यावयास हवे होते किंवा दाव्यातील गुंतलेले सर्व प्रश्नांचे परिणामकारकरित्या व पुर्ण निराकरण करुन दावा निकाली काढणे न्यायालयास सोयीचे होणारे असल्यास न्यायालय अशा व्यक्तीला दाव्यात सामील करण्यास परवानगी देवु शकते.

७. वादीने प्रस्तुत दावा तुटक वाटप होवुन मिळणेसाठी, मनाई मिळणेसाठी तसेच ठरावासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ आणि २ हे मयत झाले असुन, त्यांचे वारस देखील नि.क्र.४० व ४१ वरील अर्जानुसार घेण्यात आलेले आहेत. नि.क्र.४० व ४१ वरील अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदार हा मयत प्रतिवादी क्र.१ व २ यांचा मुलगा आहे ही बाब लिखीत स्वरुपात नाही. प्रस्तुत अर्जास वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. प्रस्तुत दावा हा वाटपाचा असल्याने सर्व वारस हे पटलावर येणे आवश्यक आहे व ते दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत.

८. अशा परिस्थितीत महेश महादेव मगदुम यांना नियोजित प्रतिवादी म्हणून प्रस्तुत दाव्यात सामील करून घेतल्यास वादीचे कुठल्याही प्रकारे नुकसान होण्याची संभावना नाही. त्यामुळे नियोजित प्रतिवादी म्हणून अर्जदाराला प्रस्तुत दाव्यातील दावामिळकत संदर्भात त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल म्हणून दाव्यातील वादासंबंधी वादी व प्रतिवादी यांचे

हक्कांसंदर्भात गुणदोषावर न्यायनिर्णय करण्याकरीता नियोजित प्रतिवादी म्हणून अर्जदाराला प्रस्तुत दाव्यात प्रतिवादीपणात समाविष्ट करुन म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. करीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज (नि.क्र.४७) मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार महेश महादेव मगदुम यांना नियोजित प्रतिवादी म्हणून प्रस्तुत दाव्यात सदर आदेशाच्या १४ दिवसांच्या आत पक्षकार म्हणुन समाविष्ट करावे.

३. वादी यांनी कायदेशीर मुदतीत दावा दुरुस्त करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावयाची आहे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

KULKARNI PRAVIN UMAKANTRAO
Digitally signed by KULKARNI PRAVIN UMAKANTRAO Date: 2025.06.13 17:54:55 +0530

मिरज
दि.१३.०६.२०२५.

**(पी. यु. कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
मिरज.

## "CERTIFICATE"

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : **Mr. S. K. Jadhav, (Grade-3)**

| | | |
|---|---|---|
| Court & Judge Name | : | P.U.Kulkarni<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon. |
| Date of Order | : | 13/06/2025. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 13/06/2025. |
| Order uploaded on | : | 13/06/2025. |